**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- २०/०५/२०१८

## सुरगाण्यात IPL मॅचवर सट्टा लावणारे इसमांवर छापा
## स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

---

जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे आदेशान्वये धडक कारवाई सुरू आहे. सध्या सुरू असलेल्या आय.पी.एल. सामन्यांदरम्यान लाईव्ह मॅच पाहुन लोकांकडुन पैशांची बोली लावुन सट्टा खेळणारे व खेळविणारे इसमांवर सत्वर कारवाई करणेबाबत मा.पोलीस अधीक्षकांनी आदेशित केले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने दिनांक १९/०५/२०१८ रोजी रात्रीचे सुमारास नाशिक जिल्हयातील अतिदुर्गम भाग असलेल्या सुरगाणा शहरातील पंचाळ गल्ली परिसरात आय.पी.एल. मॅचर सट्टा लावणारे इसमांवर छापा टाकुन सुमारे ३८ हजार ८८० रू. चा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दिनांक १९/०५/२०१८ रोजी आय.पी.एल. मालिकेत सनरायझर्स हैदराबाद व कोलकाता नाईट रायडर्स या संघांचा क्रिकेट सामना सुरू होता, दरम्यान सुरगाणा शहरात सदर सामन्यावर बेटींग सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळाली, त्यानुसार स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सुरगाणा शहरातील पंचाळ गल्ली एका रूममध्ये अचानक छापा टाकला. सदर ठिकाणी इसम नामे **१) विशाल सुधाकर शिरसाठ**, वय ३३ व **२) तुषार उल्हास आहेर**, वय २६, दोन्ही रा. ग्रामपंचायत रोड, कृष्णनगर, सुरगाणा यांना जागेवरच ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेले इसम हे त्यांचे साथीदारांसह वरील आय.पी.एल.सामना लाईव्ह पाहुन त्यांचे ताब्यातील लॅपटॉप व मोबाईलव्दारे लोकांकडुन पैसे लावुन घेवुन सट्टा खेळतांना व खेळवितांना मिळुन आले. सदर छाप्यात ताब्यात घेतलेले इसमांचे कब्जातुन विविध कंपन्यांचे **०६ मोबाईल फोन, ०१ डेल कंपनीचा लॅपटॉप, रोख ७,८८०/- रूपये** , तसेच आय.पी.एल.बेटींगसाठी लावण्यात आलेले अंक आकडे लिहीलेले रजिस्टर **असा एकुण ३८,८८०/- रूपये किं.चा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आला आहे. वरील आरोपीतांचे इतर साथीदार पोलीसांची चाहुल लागताच पळुन गेले असुन वरील सर्व आरोपीतांविरूध्द **सुरगाणा पोलीस ठाणेस मुंबई जुगार प्रतिबंधक कायदयान्वये गुन्हा दाखल** करण्यात आलेला आहे. ताब्यात घेतलेले वरील दोन्ही सट्टेबाज हे वेगवेगळया मोबाईल फोनव्दारे दर ०२ दिवसांनी वेगवेगळया कंपन्यांचे सिम बदलुन कॉलिंग करून ॲडव्हान्स पैसे घेवुन सट्टा खेळत असल्याचे समजले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, पोलीस उपनिरीक्षक **श्री. मच्छिंद्र रणमाळे**, पोहवा/दिपक आहिरे, हनुमंत महाले, पोना वसंत खांडवी, जालिंदर खराटे, अमोल घुगे, पोकॉ हेमंत गिलबिले, संदिप लगड यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे. अतिदुर्गम भागात आय.पी.एल. मॅचवर सट्टा खेळणा-यांवर पहिल्यांदाच कारवाई करण्यात आली असुन आगामी काळात अशाचप्रकारे कारवाई सुरू राहणार आहे.